(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

१९९६ -१-एससीआर- ३९१

उत्तर प्रदेश राज्य आणि इतर

वि .

डॉ. रमेश प्रसाद

जानेवारी ११, १९९६

**[न्या. के. रामास्वामी आणि न्या. जी. बी. पट्टनायक ]**

सेवा कायदा :

उत्तर प्रदेश राज्य विद्यापीठ अधिनियम, १९७३—कलम २(१८), २(१९), ४९(डी) - तयार केलेले परिनियम - १६.२४, १७.०१- नियत सेवावधि -राज्य शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये काम करणारे शिक्षक- निर्णय दिला की, उत्तर प्रदेश नागरी सेवा नियमावलीच्या विनियम ५२० अन्वये शासनाने स्पष्ट आदेश दिल्याशिवाय वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्यावर नोकरीत राहण्यात हक्कादार नाही.

दिवाणी अपील अधिकरिता : दिवाणी अपील क्रमांक २५५९/१९९६.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या १९९०च्या सी. संकीर्ण रि. या. क्र. ३३२७७ मधील दिनांक २१.१२.९० निर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी टी.एन.सिंग, बी.एम.शर्मा आणि आर.बी.मिश्रा.

न्यायालयाने पारित केलेला आदेश खालील प्रमाणे आहे :

अनुमति दिली.

उत्तरवादीला नित्यक्रमात १० सप्टेंबर १९९३ रोजी नोटीस पाठविण्यात आली असली तरी आजतागायत नोटीस सेवेचा अहवाल पाठविण्यात आलेला नाही किंवा पोच मिळालेली नाही. या परिस्थितीत, नोटीस उत्तरवादींनवर बजावण्यात आली आहे असे समजले पाहिजे.

या प्रकरणात एकच वाद आहे तो म्हणजे आग्रा येथील मोतीलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालयात अध्यापन करणारे उतरवादी-शिक्षक नियत सेवावयमान ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत सेवेत राहण्यास हक्कदार आहेत का? असा दावा करत उत्तरवादीने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने संबंधित तरतुदींचा विचार न करता सीएमडब्ल्यूपी क्रमांक ३३२७७/९० मधील २१ डिसेंबर १९९० च्या आक्षेपित आदेशात उतरवादीचे नियत सेवावयमान ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत सेवेत कायम ठेवण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले होते आणि वस्तुतः रिट याचिका मंजूर केली. या प्रश्नास्पद आदेशावर हरकत घेऊन विशेष परवानगीने वरील अपील दाखल केले आहे. आम्ही विद्वान वकिलांना संबंधित नियम आमच्यासमोर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. यु.पी. राज्य विद्यापीठ अधिनियम, १९७३ (संक्षिप्तात "अधिनियम") च्या कलम २ (१८) मध्ये शिक्षकाची व्याख्या केली आहे. या कलमात असे म्हटले आहे:

> "२ (१८). " शिक्षक" म्हणजे विद्यापीठात किंवा संस्थेत किंवा घटक संलग्न किंवा सहयोगी महाविद्यालयात शिक्षण देण्यासाठी किंवा मार्गदर्शन किंवा संशोधन करण्यासाठी नियुक्त केलेली व्यक्ती आणि त्यात प्राचार्य किंवा संचालक यांचा समावेश आहे. '[मी]

अधिनियमाच्या कलम २ (१९) मध्ये विद्यापीठ शिक्षकाची व्याख्या करण्यात आली आहे जी खालीलप्रमाणे आहे.

> "२ (१९) 'विद्यापीठाचे शिक्षक' म्हणजे विद्यापीठात किंवा संस्थेत किंवा विद्यापीठाद्वारे चालविल्या जाणाऱ्या घटक महाविद्यालयात शिक्षण आणि मार्गदर्शन किंवा संशोधन करण्यासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेले शिक्षक"

या अधिनियमाच्या कलम ४९ (डी) अन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करून राज्य शासनाने परिनियम तयार केलेत आणि परिनियम १६.२४ विद्यापीठातील शिक्षकांना नियत सेवावयमान ६० वर्षे विहित करत. परिनियम १७.०१ अन्वये असे नमूद करण्यात आले आहे की, प्रकरणातील तरतुदी केवळ राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाद्वारे चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही महाविद्यालयातील शिक्षकांना लागू होणार नाहीत.

उत्तर प्रदेश नागरी सेवा नियमावलीच्या नियम ४५९ अन्वये सरकारी कर्मचाऱ्याच्या सक्तीच्या निवृत्तीची तारीख (दुसऱ्या शब्दांत नियत सेवावयमान) वितिय निदेश पुस्तिका खंड २ मध्ये वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे असेल. यु.पी. वितिय निदेश पुस्तिका खंड १ ते ४ मध्ये अंतर्भूत मूलभूत नियम ५६ (अ) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे.

> "५६ (अ) या नियमातील इतर खंडातील तरतुदी वगळता, कनिष्ठ सेवेतील सरकारी कर्मचारी वगळता इतर सरकारी कर्मचाऱ्याच्या सक्तीच्या निवृत्तीची तारीख म्हणजे त्याचे वय ५८ वर्षे पूर्ण होण्याची तारीख आहे. सक्तीच्या निवृत्तीच्या तारखेनंतर सार्वजनिक

कारणास्तव शासनाच्या मान्यतेने त्यांना सेवेत कायम ठेवता येईल, तसेच अत्यंत विशेष परिस्थिती वगळता वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना ठेवता कामा नये."

यु.पी. नागरी सेवा नियमावलीच्या नियम ५२० मध्ये असंही विचार करण्यात आला आहे की, महसूल किंवा स्थानिक निधीतून सेवावयमान किंवा पूर्णसेवा निवृत्तीवेतन प्राप्त झालेल्या अधिकाऱ्याला, सार्वजनिक कारण वगळता, पुन्हा कामावर घेतले जाणार नाही किंवा त्याची सेवा चालू राहणार नाही. नोकरीच्या अटींच्या मुदतवाढीवर मुदतवाढ किंवा परत कामावर घेणे खाली नमूद केलेल्या परिस्थितीत दिली जाऊ शकते, जे खालीलप्रमाणे आहे :

(१) संबंधित प्रशासकीय विभागात भारत सरकारतर्फे, जेव्हा निवृत्तीवेतनधारी थेट भारत सरकारच्या अखत्यारित राजपत्रित नियुक्तीच्या निवृत्तीपूर्वी सेवा बजावतो किंवा कोणत्याही सेवेच्या शाही सेवा किंवा शाही शाखेशी संबंधित असतो, किंवा एक अधिकारी होता, ज्याला निवृत्तीपूर्वी सामान्यत: शाही सेवा किंवा शाखेच्या अधिकाऱ्यांनी भरलेले पद असते;

(२) इतर प्रकरणांमध्ये, ज्या राज्य सरकारच्या प्रशासनाखाली निवृत्तीवेतनधारकाला पुन्हा कामावर घेतले जाते;

(३) राज्य शासनाला दुय्यम असलेल्या कोणत्याही प्राधिकरणाद्वारे, जेव्हा राज्य सरकार अशा प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील आस्थापनांमध्ये पुन्हा कामावर घेतलेल्या निवृत्तीवेतनधारकाच्या बाबतीत या अनुच्छेदानुसार आपले अधिकार प्रत्यायुक्त करू शकते. .

टीप :- राज्य सरकार जाहीर करू शकते की या अनुच्छेदातील निर्बंध कोणत्याही विशिष्ट स्थानिक निधीला किंवा राज्यक्षेत्रातील कोणत्याही विशिष्ट वर्गाच्या स्थानिक निधीला लागू होणार नाहीत किंवा ते निर्देश देतील अशा सुधारणांच्या अधीन राहून लागू होतील. "

त्यामुळे विद्यापीठातील शिक्षक हे या अधिनियमाद्वारे व त्याअंतर्गत करण्यात आलेल्या परिनियामानानुसार चालतात, हे स्पष्ट होईल. नियम १६.२४ च्या कार्यान्वयनाने विद्यापीठातील शिक्षकांचा नियतसेवावधी ६० वर्षे विहित करण्यात आला आहे. केवळ राज्य सरकार किंवा स्थानिक प्राधिकरणाद्वारे चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही महाविद्यालयाचा शिक्षक हा यापूर्वी नमूद केलेल्या विनियमांनुसार शासित सरकारी सेवक आहे. या अधिनियमांतर्गत करण्यात आलेल्या कायद्यांनुसार विद्यापीठ शिक्षक हा असा वर्ग आहे ज्यासाठी या कायद्यातील तरतुदींनुसार नियत सेवावधीचे विशिष्ट वय निश्चित करण्यात आले आहे, तर शिक्षक जरी राज्य सरकारच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कार्यरत असले तरी ते राज्य सरकारच्या अधिपत्याखालील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कार्यरत असले तरी ते विनियमांमद्धे विहित केलेल्या आणि नियत सेवावधी ५८ वर्ष पूर्ण झाल्यावर विहित करत, त्या राज्य सरकारच्या सेवा नियमांनुसार शासित केले जातात. त्यामुळे उत्तर प्रदेश नागरी सेवा नियमावलीच्या नियम ५२० अन्वये शासनाने स्पष्ट आदेश दिल्याशिवाय राज्य शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कार्यरत डॉक्टर-शिक्षकांना वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्यावर नोकरीत राहण्याचा अधिकार नाही. उच्च न्यायालयाचा हा आदेश प्रथमदर्शनी अवैध आहे. जर उत्तरवादी वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर सेवेत राहिले तर, न्यायालयाच्या आदेशानुसार, ते ५८ वर्षे पूर्ण झाल्यावर परिणामस्वरूप प्रभावासह निवृत्त झाल्याचे मानले जावे.

त्यानुसार अपील मंजूर केले जाते. उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करून रिट याचिका फेटाळली जाते. उत्तरवादी हजर होत नसल्याने खर्चाबाबद कोणतेही आदेश नाही.

जी.एन अपील मंजूर.

**x-x-x-x**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**